# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील चाविंद्रा डंपिंग ग्राऊंड साईट नं.१०६ येथे पत्रयाचे कुंपन बांधणे करीता स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा॰ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.७/१०/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. ७/१०/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) | रु. ९५८.६७ लक्ष | रु. ९५८.६७ लक्ष | रु.०.०० लक्ष | |
| | **एकूण** | **रु. ९५८.६७ लक्ष** | **रु. ९५८.६७ लक्ष** | **रु.०.०० लक्ष** | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील स्वच्छ भारत अभियान (मनपा हिससा) या लेखाशिर्षामधील निधी पुर्णपणे संपलेला आहे. खालील कामाचे देयक रु.१२,१२,०२४/- इतक्या रक्कमेचे असून सदर काम हे स्वच्छ भारत अभियान या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित होते. सदरचे काम ठेकेदाराने विहीत वेळेत पुर्ण केलेले आहे. मात्र सदर लेखाशिर्षामधील निधी शासनाकडे पाठविला गेला असल्यामूळे देयक अदा करणेकामी सदर लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नाही. सबब बांधकाम विभागामधून निधीचे पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणेबाबत मा.प्रशासक तथा आयुक्त सा॰ो. यांनी दिनांक २४/०९/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी खालील कामाकरीता बांधकाम विभागाकडील "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधुन रु. १३,०००००/- लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|
| भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील चाविंद्रा डंपिंग ग्राऊंड साईट नं.१०६ येथे पत्राचे कुंपन बांधणे बाबत. | रु. १२.१२ लक्ष | |
| एकूण | रु. १२.१२ लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. ७/१०/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. ७/१०/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा | रु.१००.०० लक्ष | रु.१६.५५ लक्ष | रु.८३.४५ लक्ष | रु.१३.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांच्याकडे निहीत आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील चाविंद्रा डंपिंग ग्राऊंड साईट नं.१०६ येथे पत्राचे कुंपन बांधणे बाबत. विषयांकित कामाचे देयक अदाकरावयाचे असून निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे पुनर्विनियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी पुनर्विनियोजन करणेस दि.२४/०९/२०२४ रोजी मान्यता दिलेले आहेत. त्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु.१३.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक /१०/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ६५८ **दिनांक** १४ **/१०/२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील चाविंद्रा डंपिंग ग्राऊंड साईट नं.१०६ येथे पत्राचे कुंपन बांधणे बाबत. विषयांकित कामाचे देयक ठेकेदार यांना अदा करावयाचे असून निधी अभावी प्रलंबित आहे. स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नाही. सदर लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणे गरजेचे आहे. तरी स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून एकूण रु.१३.०० लक्ष निधीचे पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिसरी मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपलिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकरीता मजूर सेवा पुरविणेकामी रु.१,०१,६२,४८३/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र.९९१/ २०२३, दि.२१/०६/२०२३ अन्वये कार्यादेशानुसार मे बरकत कॉन्ट्रक्टर्स यांचे नावे काम मंजूर झालेले आहे. सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेकामी रु.१,०७,८१,६२१/- मात्र खर्च अपेक्षित असुन मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव क्र.३९९, दि.०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा क्र.६६/२०२३-२४ दिनांक ०७/०३/२०२४ ते दि.२१/०३/२०२४ या कालावधीत पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि.२६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. मात्र लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ करीता आदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत होती. तसेच मा.भारत निवडणुक आयोगाने दि.२४/०५/२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये २ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर दि.२४/०५/२०२४ ते दि.०५/०७/२०२४ पर्यंत आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आलेली असल्याने, सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास दि.०१/०४/२०२४ ते ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता पहिली तसेच ०१/०७/२०२४ ते १५/०९/२०२४ पर्यंत (२.½) अडीज महिन्यांची दुसरी मुदतवाढीच्या प्रस्तावास प्रशासकीय आर्थीक व ठरावास मान्यता घेऊन कार्यादेश देणेंत आलेला आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेबाबत कामाच्या निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यतेकरीता सादर केली असता सदर एक वर्ष मुदतीची निविदा रद्द करुन नव्याने तीन वर्षाची ई निविदा काढण्याचे निर्देश मा.आयुक्त सो यांनी दिले आहे. निर्देशानुसार तीन वर्षाच्या प्रस्तावास अंदाजपत्रकीय मान्यता मिळाली असुन प्रशासकीय व आर्थीक मान्यतेकरीता सादर करण्यात आले आहे. खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ई निविदा प्रसिध्द करुन,कार्यादेश देणे करीता माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

तरी सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत (२.½) महिन्यांचे देयक सन २०२४-२५ तरतुदी मधुन अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिसरी मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेबाबत.** | **२१,०६,५९८/-** |

सदर कामाकरीता दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ पर्यंत मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

सदर कामाकरीता मे.बरकत कॉन्ट्राक्टर्स यांचे सन २०२३-२४ वर्षाच्या ई निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत **रु.२१,०६,५९८/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता तिसरी मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय ठरावास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ६५८ **दिनांक** १४/१०/**२०२४**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्ती कामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास तिसरी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्य क्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्ती कामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ या कालावधीच्या तिस-या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिसरी मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणे कामी रु.१,२१,०१,८४९/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र.९९०/२०२३, दि.२१/०६/२०२३ अन्वये कार्यदेशानुसार मे.बरकत कॉन्ट्रक्टर्स यांचे नावे काम मंजूर झालेले आहे.सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेकामी रु.१,२८,६५,५३६/- मात्र खर्च अपेक्षित असुन मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव क्र.३९९, दि.०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा क्र.६६/२०२३-२४ दिनांक ०७/०३/२०२४ ते दि.२१/०३/२०२४ या कालावधीत पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि. २६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. मात्र लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ करीता आदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत होती. तसेच मा.भारत निवडणुक आयोगाने दि.२४/०५/२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये २ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर दि.२४/०५/२०२४ ते दि.०५/०७/२०२४ पर्यंत आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आलेली असल्याने, सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास दि.०१/०४/२०२४ ते ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता पहिली तसेच ०१/०७/२०२४ ते १५/०९/२०२४ पर्यंत (२.½) अडीज महिन्यांची दुसरी मुदतवाढीच्या प्रस्तावास प्रशासकीय आर्थीक व ठरावास मान्यता घेऊन कार्यादेश देणेंत आलेला आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेबाबत कामाच्या निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यतेकरीता सादर केली असता सदर एक वर्ष मुदतीची निविदा रद्द करुन नव्याने तीन वर्षाची ई निविदा काढण्याचे निर्देश मा.आयुक्त सो यांनी दिले आहे. निर्देशानुसार तीन वर्षाच्या प्रस्तावास अंदाजपत्रकीय मान्यता मिळाली असुन प्रशासकीय व आर्थीक मान्यतेकरीता सादर करण्यात आले आहे. खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ई निविदा प्रसिध्द करुन,कार्यादेश देणे करीता माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

तरी सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिषकात रु.६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत (२.½) महिन्यांचे देयक सन २०२४-२५ तरतुदी मधुन अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिसरी मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेबाबत.** | **२५,२१,२१९/-** |

सदर कामाकरीता दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/२०२४ पर्यंत मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता मे.बरकत कॉन्ट्राक्टर्स यांचे सन २०२३-२४ वर्षाच्या ई निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.५०** टक्के कमी असल्याने दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत **रु.२५,२१,२१९/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता तिसरी मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय ठरावास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ६६० **दिनांक** १४/१० **/२०२४**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चेकार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास तिसरी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी मजुर सेवा पुरविणेच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ या कालावधीच्या तिस-या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिस-या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबतचा प्रशासकीय ठराव.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी रु.२,४४,०२,१८६/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र. ९९२ दिनांक २१/०६/२०२३ अन्वये कार्यादेशानुसार मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे नावे मंजूर झालेली आहे. सदर निविदेची मुदत दि. ३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी रु.२,७०,९६,५१५/- मात्र खर्च अपेक्षित असून मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव ४०१ दिनांक ०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा दिनांक ६३/२०२३-२४ दि. ०७/०३/२०२४ ते २१ / ०३/२०२४ या कालवधी पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि.२६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. मात्र लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता अदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत होती. तसेच मा. भारत निवडणुक आयोगाने दि.२४/०५/२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये २ पदवीधर व २ शिक्षक मतदार संधाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर दि.२४/०५/२०२४ ते ०५/०७/२०२४ पर्यंत आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आलेली असल्याने सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास दि. ०१/०४/२०२४ ते ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता रु. ६१,००,५४७/- मात्र रक्कमेचा पहिल्या मुदतवाढीचा प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय, आर्थिक व ठरावास मान्यता घेऊन संदर्भ क्र. २ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच सदर कामास दि.०१/०७/२०२४ ते १५/०९/२०२४ पर्यंत अडीज महिन्यांची दुसरी मुदतवाढीस प्रशासकीय मान्यता घेऊन कामाच्या ठरावास मान्यता घेऊन संदर्भ क्र.३ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत एक वर्ष मुदतीच्या कामाची ई-निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यतेकरीता सादर केली असता सदर एक वर्ष मुदतीची निविदा रद्द करुन नव्याने तीन वर्षाची ई-निविदा काढण्याचे निर्देश मा. आयुक्त सो. यांनी दिले आहेत. निर्देशानुसार तीन वर्षाच्या प्रस्तावास अंदाजपत्रकीय मान्यता मिळाली असून प्रशासकीय व आर्थीक मान्यतेकरीता सादर करण्यात आले आहे. खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रसिध्द करुन कार्यादेश देणे करीता माहे नोव्हेबंर २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु. ६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून दि.१६/०९/२०२४ ते ३०/११/ २०२४ या अडीज महिन्यांचे देयक सन २०२४-२०२५ तरतुदी मधून अदा करण्यात येईल.

तरी सन २०२३-२०२४ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे.बरकत कॉन्ट्राक्टर यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने **दि.१६/०९/२०२४ ते दि. ३०/११/२०२४** रोजी पर्यंत **रु. ५०,५८,३७०/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता दुस-या मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामाकरीता तिस-या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबत.** | रु.५०,५८,३७०/- |

सदर कामाकरीता दिनांक १६/०९/२०२४ ते दि. ३०/११/२०२४ पर्यंत मुदतवाढीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे सन २०२३-२०२४ मधील निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास तिसरी मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सादर.

**प्रशासकीय ठराव क्र.** ६६१ **दिनांक** १४/१० **/ २०२४**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास तिसरी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास दि.१६/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ या कालावधीच्या तिस-या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
०१C **प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी मजुर सेवा पुरविणे बाबत. (३ वर्षाकरीता).**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रफळ २६.०४ चौ.कि.इतके असून सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ७,११,३२७ इतकी आहे. भिवंडी शहर वस्त्रोउद्योग धंद्याचे असून भिवंडी शहरांत उद्योगधंद्यासाठी शहरा लगत व इतर राज्यातून नागरीक ये जा करीत असतात व काही नागरीक वास्तव करून राहत असून शहराची तरंगती लोकसंख्या ३.५० लक्ष अशी एकुण १०.५० लक्ष इतकी लोकसंख्या आहे.

भिवंडी शहरात स्टेम प्राधिकरण यांचेकडून ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ४२ द.ल.लि. तसेच मनपाचे वऱ्हाळा तलावमधून ५ द.ल.लि. असा एकुण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. लोकसंख्येच्या मानाने पाण्याची गरज १५० द.ल.लि प्रतिदिन इतकी पाण्याची आवश्यकता असून शहरामध्ये ३० द.ल.लि प्रतिदिन पाणी पुरवठयाची तुट असल्यामूळे शहरात पाणी टंचाई भासत आहे.

शहरामध्ये पाणी टंचाईग्रस्त भागात बोअरवेलव्दारे नागरीकांची पाण्याची गरज भागवीली जाते. प्रभाग समिती क्र.१ ते ५ दरम्यान १०३९ हातपंप, १०२४ सबमर्सिबल व जेट पंप ५२ असे एकुण २०९४ बोअरवेल आहेत. सदर बोअरवेल वारंवार किरकोळ दुरुस्तीमूळे नादुरुस्त होत असतात. तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात ३७५ चौ. मिटर जलवितरण व्यवस्था असून शहरातील जलवाहीनी गळती, घाण पाण्याची तक्रारी तसेच जलवाहीनी चेकअप व जलवाहीवर असलेले स्लुस व्हॉल्वचे गळती थांबविणेकरीता अशा दैनंदिन स्वरुपाच्या तक्रारीचे निवारण करून प्रभागातील नागरीकांना होणारा पाणी पुरवठा नियमित व पुरेशा प्रमाणात करणेत येतो. सन्मा.माजी नगरसेवक/नगरसेविका व पदाधिकारी, नागरीक यांचे दुरध्वनी, भ्रमणध्वनी व लेखी स्वरुपात दैनंदिन तक्रारी प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये प्राप्त होत असतात. बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी येणाऱ्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्याचे दैनंदिन काम करावे लागते.

उन्हाळयात धरण पाणलोट क्षेत्रातील धरणातील पाण्याची पातळी कमी होत असते. स्टेम प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पाणी कपात केली जाते. त्यामूळे जलवाहीनीमधून कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा असतो. त्यामूळे पाणी टंचाईची परिस्थीती निर्माण होण्याचे दिवसांत नागरीकांना जलवितरण व्यवस्थेव्दारे तसेच बोअरवेल, हातपंप,सबमर्सिबल,जेटपंपाव्दारे नियमिती व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी बोअरवेल व पाईप लाईन निगा व दुरुस्तीचे कामासाठी मजूर सेवा पुरविणेकामी मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्र निहाय बोअरवेल निगा दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेकरीता प्रत्येकी ४ अकुशल कामगार व १ अर्धकुशल तसेच पाईप लाईन निगा दुरुस्ती करीता प्रत्येकी ५ अकुशल कामगार व १ अर्धकुशल असे बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एकुण ५५ (कंत्राटी कामगार ) मजूर सेवा पुरविणे कामी रु.७,१८,३८,६९३/- मात्र रक्कमेस दि. १४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळालेली आहे.

त्याकरीता मा. सहा.कामगार आयुक्त सो, भिवंडी यांचे कंत्राटी पध्दतीने/ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता मिळुन वेतन निश्चित करणेबाबत दर प्राप्त करून त्यास दि.१५/०२/२०२४ अन्वये मा आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त् झालेली आहे. त्यानुसार प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकरीता मजूर सेवा पुरविणेचे काम ३ वर्ष कालावधी करीता रु.७,१८,३८,६९३/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी ३ वर्षाकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत.** | **७,१८,३८,६९३/-** |

सद्या कालावधीत मा.महासभा व मा स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे मा. प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा व दुरुस्तीकरीता ३ वर्ष कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या कामाकरीता प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रंमाक** ६६२ **दिनांक** १४/१०/**२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी ३ वर्ष कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत रु.७,१८,३८,६९३/- मात्रच्या प्रस्तावास तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यामध्ये वाढ होत असल्याने कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्त्याची वाढ देय असणाऱ्या प्रशासकीय व आर्थीक ठरावास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेलया अधिकारानुसार मी अजय वैद्य,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ त ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेबाबत रु.७,१८,३८,६९३/- मात्र व वेळोवेळी वाढ होणाऱ्या मुळ वेतन व विशेष भत्त्याच्या वाढीव रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थीक मंजूरीच्या प्रशासकीय ठरावास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबत ३ वर्ष कालावधीच्या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.४० चौ.कि.मि. असून पाणी पुरवठा विभागाचे दैंनदिन कामकाज प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय चालते. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी निविदेची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली आहे. सन २०२४-२५ या एक वर्ष कालावधीकरीता प्रसिध्द करण्यात आलेली ई-निविदा रद्द केल्याने सन २०२३-२०२४ या वर्षाच्या कामाला माहे ३०/११/२०२४ रोजी पर्यंत तिसरी मुदतवाढ देण्यात आली आहे. भिवंडी शहराला स्टेम प्राधिकरण यांचेकडुन ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका कडून ४२ द.ल.लि. तसेच मनपाचे स्वत:चे व-हाळ तलाव ५ द.ल.लि. असा एकूण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

महानगरपालिकेचे आस्थापनेवर पाणी पुरवठा विभागाकरीता ५० पदे मंजुर असून त्यामधील ४९ पदे भरलेली आहे. त्यापैकी मयत- ३, सेवा निवृत्त-७, बडतर्फ- १, पाईप लाईन व बोअरवेल दुरुस्ती करीता -४, अंपग- ६ व २ कर्मचारी पदवीधर असून संगणकाचे ज्ञान असल्यामुळे पाणी पुरवठा विभागाचे संगणकीय कामकाज पाहत आहेत. तसेच १ व्हॉल्वमन ठाणे महानगरपालिकेकडे वर्ग करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सद्या २५ व्हॉल्वमन कार्यरत आहेत.

भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत होणारे नागरीकांमुळे नवीन रहिवाशी क्षेत्र मोठया प्रमाणात विकसीत होत आहे. त्यामुळे भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत झालेले क्षेत्र विचारात घेता लोकसंख्येमुळे पाणी पुरवठयाचे झोन वाढलेले आहेत. शहरात अंदाजे ४१३ व्हॉल्व आहेत. एकात्मीक पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभामधील ७ जलकुंभ कार्यान्वीत करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ११० ते १२० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरात दैंनदिन पाणी पुरवठा वितरीत करणे करीता मनपाचे आस्थापनेवर व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरात झोन निहाय वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीक यांचे भ्रमणध्वनीवरुन व दुरध्वनीवरुन तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे प्रशासनाला नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रामध्ये एकुण ६१ व्हॉल्वमन कंत्राटी कामगारांची निविदा मागविण्यांत आलेली होती. पंरतु सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये पद्मानगर, श्रीरंगनगर व कापतलाव येथील नव्याने अंथरणेत आलेल्या जलवाहिनी मधून झोन निहाय पाणी पुरवठा करणे कामी ३ नवीन व्हॉल्वमनची गरज असल्याने तीन वर्षाकरीता एकूण ६४ व्हॉल्वमन (कंत्राटी कामगार) ची आवश्यकता लागणार आहे.

उपरोक्त विषयांकीत कामाकरीता मा.आयुक्त सो. यांची दि.०३/१०/२०२४ रोजी सन २०२४-२५ या वर्षाकरीता प्रसिद्ध करण्यांत आलेली निविदा रद्द करुन ३ वर्षाच्या कालावधी करीता अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रसिद्ध करणे कामी मंजुरी प्राप्त झालेली आहे.

मा. कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.), मुंबई व सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ मुंबई यांचे कडुन किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील कामगारांसाठी विशेष भत्त्यांचे दर मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालय कामगार भवन ई-ब्लॉक, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पु.) मुंबई-४०००५१ द्वारे कामगारांचे वेतन दर प्रत्येकी ६ महिन्यांच्या कालावधी करीता ऑनलाईन प्रसिद्ध होत असतात.

**शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यांमध्ये वाढ होत असुन कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्ता देय असणार आहे. त्यामुळे मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये वारंवार वाढ होणार आहे. तसेच वाढीव वेतन व भत्यांच्या रक्कमेची प्रत्येक आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या तरतुदीमध्ये वेळोवेळी नियोजन करुन देयक अदा करावे लागणार आहे. मुळ अंदाजपत्रकात देखील प्रत्येक ६ महिन्यांनी वाढ होणार असुन वेळोवेळी संबंधीत ठेकेदारास वाढीव रक्कम देय असणार आहे.**

उपरोक्त कामासाठी भाडे तत्वावर मजुर सेवा पुरविणे या लेखाशिर्षात प्रत्येक आर्थिक वर्षात तरतुद करण्याची तजवीज आहे. मा.आयुक्त सो. यांनी दि.०३/१०/२०२४ रोजी दिलेला अभिप्राय व निर्देशानुसार सन २०२४-२५ या वर्षाकरीता प्रसिद्ध करण्यांत आलेली निविदा रद्द करुन भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेचे काम ३ वर्ष कालावधी करीता एकूण ६४ व्हॉल्वमन (कंत्राटी कामगार) सेवा पुरविणे कामी रु.८,३७,२०,६८८/- मात्र रक्कमेस दि. १४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळालेली आहे.

त्याकरीता मा. सहा. कामगार आयुक्त सो. भिवंडी यांचे कंत्राटी पध्दतीने / ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता मिळुन वेतन निश्चित करणे बाबत दर प्राप्त करुन त्यास दि. १५/०२/२०२४ अन्वये मा.आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेचे काम ३ वर्ष कालावधी करीता रु.८,३७,२०,६८८/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात ३ वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत.** | **८,३७,२०,६८८/-** |

सद्या कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात ३ वर्ष कलावधी करीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबतच्या कामाकरीता प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ६६३ **दिनांक** १४/१० **/२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात ३ वर्ष कालावधी करीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबत **८,३७,२०,६८८/-** मात्रच्या प्रस्तावास तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यामध्ये वाढ होत असल्याने कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्त्याची वाढ देय असणा-या प्रशासकीय व आर्थीक ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात ३ वर्ष कालावधी करीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबत रु. **८,३७,२०,६८८/-** मात्र व वेळोवेळी वाढ होणा-या मुळ वेतन व विशेष भत्त्याच्या वाढीव रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थिक मंजुरीच्या प्रशासकीय ठरावास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
u/c **भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय :- भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे.**

**संदर्भ :- १) शासनाच्या जीईएम पोर्टलवरील Bid No. GeM/२०२३/B/४२४१४४१ (सक्शन खरेदी)**
**२) शासनाच्या जीईएम पोर्टलवरील Bid No. GeM/२०२३/B/४२६५९७६ (जेटींग खरेदी)**

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपरोक्त संदर्भित विषयान्वये भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन खरेदी करणे कामाची शासनाच्या जीईएम पोर्टलवरील निविदा क्र. GEM/२०२३/B/४२४१४४१, व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामाची शासनाच्या जीईएम पोर्टलवरील निविदा क्र. GeM/२०२३/B/४२६५९७६, दि.२९/१२/२०२३ ते दि.०८/०१/२०२४ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली असता सदर निविदेमध्ये १) M/S. A B Infrastructure, २) M/S. KGN Environment Industries ३)M/S.Sidra System & Solution LLP ४). M/S. U S Enterprises या ०४ निविदाकारांनी सहभाग घेतला असुन यांच्या तांत्रिक कागदपत्रांची छाननी निविदा समिती मार्फत केली असता १).M/S. A B Infrastructure, २).M/S. KGN Environment Industries ३).M/S. Sidra System & Solution LLP या निविदाकारांना निविदा समितीने पात्र ठरविले आहे.

निविदा क्र. GEM/२०२३/B/४२४१४४१ मधील पात्र निविदाकारांचे प्राईज बिड लिफाफा क्र.२ उघडले असता भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन खरेदी करणे कामी सर्वात कमी दर L१ चे दर १) M/s. A B INFRASTRUCTURE यांनी रक्कम रु.२४,४५,०००/- असे सादर केले असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०४% ने कमी आहेत.

निविदा क्र. GeM/२०२३/B/४२६५९७६ मधील पात्र निविदाकारांचे प्राईज बिड लिफाफा क्र.२ उघडले असता भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामी सर्वात कमी दर L१ चे दर १) M/s. A B Infrastructure यांनी रक्कम रु.३१,२०,०००/- असे सादर केले असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१६% ने कमी आहेत.

तरी M/s. A B Infrastructure यांचे सक्शन वाहन खरेदी करणे कामी L१ चे दर रु.२४,४५,०००/- व जेटींग वाहन खरेदी करणे कामी L१ चे दर रु.३१,२०,०००/- प्रमाणे सक्शन वाहन व जेटींग वाहन खरेदी करणे कामी एकुण दर रु.५५,६५,०००/- प्राप्त झाले असुन त्यास दरास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामी मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दि.१० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त सो यांना प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आले असल्याने मा. प्रशासक / स्थायी समितीचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांना प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दि.१० जुन २०२२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट- कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मा. प्रशासक / स्थायी समिती यांची मान्यता मिळणे कामी सादर.

**प्रशासकीय / स्थायी समिती ठराव क्र :-** ६६४ **दिनांक :-** १४/१०/२०२४

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन खरेदी करणे कामाची शासनाच्या जीईएम पोर्टलवरील निविदा क्र. शासनाच्या जीईएम पोर्टलवरील निविदा क्र. GEM/२०२३/B/४२४१४४१, दि.२९/१२/२०२३ ते दि.०८/०१/२०२४ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली असता

सदर निविदेमध्ये M/S. A B Infrastructure यांनी सर्वात कमी दर L१ चे दर रक्कम रु.२४,४५,०००/- असे सादर केले असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०४% ने कमी आहेत.

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलाची सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामाची शासनाच्या जीईएम पोर्टलवरील निविदा क्र. GeM/२०२३/B/४२६५९७६, दि.२९/१२/२०२३ ते दि.०८/०१/२०२४ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली असता सदर निविदेमध्ये M/S. A B Infrastructure यांनी सर्वात कमी दर L१ चे दर १ रक्कम रु.३१,२०,०००/- असे सादर केले असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१६% ने कमी आहेत.

M/s. A B Infrastructure यांचे सक्शन वाहन खरेदी करणे कामी L१ चे दर रु.२४,४५,०००/- व जेटींग वाहन खरेदी करणे कामी L१ चे दर रु.३१,२०,०००/- प्रमाणे सक्शन वाहन व जेटींग वाहन खरेदी करणे कामी एकुण दर रु.५५,६५,०००/- मात्र दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, मा.स्थायी समिति/ प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**